# प्रेसनोट

दि. ११/०१/२०२४

**पोलीसांना सांगून गुन्हा दाखल न करण्यासाठी व मदत करण्यासाठी लोकसेवकाकरीता पैशाची मागणी करणा-या खाजगी इसम वकीलावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | कोथरुड पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. ०५/२०२४. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अ. |
| तक्रारदार | महिला. वय - २५ वर्षे |
| आरोपीचे नाव व पत्ता | सुमित नामदेवराव गायकवाड, वय २५ वर्ष, व्यवसाय - वकील, रा. भारती विद्यापिठ परिसर, आंबेगाव पठार, पुणे (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,००,०००/- |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ५,००,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १,७५,०००/- रुपये |
| पडताळणी दिनांक | ०३/०१/२०२४, ०४/०१/२०२४, ०८/०१/२०२४ |
| सापळा दिनांक | ०९/०१/२०२४ |

ठिकाण :- वनाझ कॉर्नर जवळ, पौड रोड, कोथरुड, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार ह्यांचे व्यक्तिगत अडचणीमुळे पोलीसांनी तक्रारदार यांचे दोन्ही मित्रांना शास्त्रीनगर पोलीस चौकी, कोथरूड येथे घेवून गेले होते. त्यानंतर तक्रारदार ह्यांचे मित्राचे ओळखीचे वकील सुमित गायकवाड याने तक्रारदार यांचेवर व दोन्ही मित्रांवर गुन्हा दाखल न करण्यासाठी पोलीसांसोबत तडजोड करतोय असे सांगून ५,००,०००/- रुपयांची मागणी केली.

खाजगी इसम वकील सुमित गायकवाड याने तक्रारदार यांचेकडून १,००,०००/- रुपये रोख व तक्रारदार यांचे मित्रांकडून फोन पे द्वारे ५०,०००/- रुपये व ५,०००/- रुपये असे एकुण १,५५,०००/- रुपये घेतले होते व ते उर्वरित रक्कम देत नाहीत तोपर्यंत तक्रारदार ह्यांच्याविरुद्ध असलेले पुरावा मी नष्ट करणार नाही असे सांगून अजून ३,५०,०००/- रुपये लाच रक्कम पोलीसांकरीता मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, खाजगी इसम वकील सुमित गायकवाड यानी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या मित्राला कोथरुड पोलीसांकडून सोडविण्यासाठी तसेच तक्रारदार हिच्यावर पोलीसंकडून गुन्हा दाखल न करण्यासाठी रक्कम रुपये ३,५०,०००/- पंचासमक्ष लाच मागणी करुन, त्यापैकी २०,०००/- रुपये खाजगी इसम वकील सुमित गायकवाड याने फोन पे द्वारे त्याचे अकाऊंटमध्ये मागणी करून पोलीस लोकसेवककरीता लाच स्विकारली. म्हणून कोथरुड पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, खाजगी इसम वकील सुमित गायकवाड याना ताब्यात घेण्यात आले आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस उपअधीक्षक विजयमाला पवार तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकावर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.